<u>**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**</u>

क्र.संगाबाअवि-३/सपमुमं/ १५९ /२०२५
दिनांक : ०७ / ०४ /२०२५

प्रति,

प्राचार्य/विभाग प्रमुख,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/
संबंधीत विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
(अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालये)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील सी.जी.एस. अभ्यासक्रमाच्या परीक्षांबाबत....**
**उन्हाळी-२०२५ परीक्षा.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील **सी.जी.एस. अभ्यासक्रमाच्या उन्हाळी-२०२५ च्या परीक्षांचे वेळापत्रक तृतीय टप्प्यात येत असल्यामुळे ते यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल**. परंतू सी.जी.एस. पद्धतीच्या बऱ्याच विषयांच्या संधी संपलेल्या असून त्यातील काही विषय हे सी.बी.सी.एस. पद्धतीत समकक्ष/समायोजित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे उन्हाळी-२०२५ परीक्षेला प्रवेशित होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयांना संधी आहेत किंवा नाहीत, तसेच संधी संपलेले विषय समकक्ष/समायोजित करण्यात आलेले आहेत का? याची संबंधीत महाविद्यालयामार्फत खात्री करून घ्यावी.

तथापि, अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमाच्या उन्हाळी-२०२५ च्या परीक्षांचे **वेळापत्रके पान क्र.१०४ ते १२२ नुसार** प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

ज्या सी.जी.एस. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे विषय सी.बी.सी.एस. पद्धतीत समकक्ष/समायोजित करण्यात आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी उपरोक्त प्रमाणे जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार समकक्ष/समायोजित विषयात परीक्षा द्यावी. सी.बी.सी.एस. पद्धतीची परीक्षा आटोपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुन्हा परीक्षा घेण्यात येणार नाही.

सर्व महाविद्यालयांना विनंती करण्यात येते की, त्यांनी जून्या (सी.जी.सी. पद्धतीच्या) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना उपरोक्त बाबीची कृपया जाणीव करून द्यावी.

आपला,

(डॉ.नितीन अं.कोळी)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रति,**

१) प्रमुख, संगणक केंद्र,
उपरोक्त वेळापत्रकातील दुरुस्ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.

**प्रतिलिपीः माहीती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

२) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३) मुख्य अधिकारी, केंद्रीय मुल्यांकन कार्यक्रम केंद्र
४) उपकुलसचिव (परीक्षा-चौकशी)
५) सहा. कुलसचिव (सारणी)
६) सहा.कुलसचिव (परीक्षा)
७) सहा.कुलसचिव (गोपनीय )

**प्रत सविनय अग्रेषित**

मा.सदस्य, व्यवस्थापन परिषद / परीक्षा व मूल्यमापन मंडळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
मा. प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.